# मिरा भाईंदर महानगरपालिका
## निवडणूक विभाग

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.२८१९२८२८/२८१९३०८७.

जा.क्र.मनपा/नि.वि./ २३९/२०२५-२६ दि. १२ / १२ /२०२५

**निवडणूक तात्काळ**
**कालमर्यादित**

## निवडणूक आदेश

मा. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य हे SVEEP पथकाद्वारे मतदारांपर्यंत पोहचून मतदानाबाबत जागरूकता आणून मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करते. आगामी महानगरपालिका निवडणूक लक्षात घेता, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अधिकाधिक लोकांनी मतदान प्रक्रियेत भाग घेवून मतदान करावे. याकरीता मा. भारत निवडणूक आयोगाच्या मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या मार्गदर्शक उपक्रम व सूचनेनूसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मतदान जागरूकता आणण्याकरीता व मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याकरीता खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्याबाबत सूचित केले आहे. खालील उपक्रम राबविण्याकरीना त्या उपक्रमासंबंधित अधिकारी/पथकप्रमुख यांना उपक्रम राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

उपक्रमासंबंधित अधिकारी/पथकप्रमुख यांनी उपक्रमाअंतर्गत करावयाच्या कामाच्या स्वरूपानूसार आपल्या अधिनस्त कर्मचा-यांच्या सहाय्याने मतदार जागृती करावयाचे आहे. केलेल्या मतदार जागरूकतेचा अहवाल मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांना सादर करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने दैनंदिन अहवाल तयार करून **समन्वय अधिकारी, राजकुमार घरत, स्पीप (SVEEP)** मिरा भाईंदर महानगरपालिका यांना सादर करावा.

**मतदार जागरुकता आणि सहभाग कार्यक्रम पथक**

**(SVEEP Systematic Voters' Education and Electoral Participation)**

| पथक प्रमुखाचे नाव/पदनाम | उपक्रम | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| **मनस्वी म्हात्रे, सिस्टीम ॲनलिस्ट**<br>**नितीन राठोड, लिपिक**<br>**सुनिल राठोड, लिपिक**<br>**माहिती व तंत्रज्ञान विभाग** | मतदार यादीत नाव शोधणे | ➢ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी मतदारांना मतदार यादीत सुलभतेने नाव शोधण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे उदा. संकेतस्थळ, मोबाईल ॲप, दुरध्वनी, कॉल सेंटर, चॅटबॉट इ. |
| **नितीन राठोड, लिपिक**<br>**जयवंत भवर,लिपिक**<br>**माहिती व जनसंपर्क विभाग** | पत्रकार परिषद | ➢ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेचच महानगरपालिका आयुक्त यांनी स्वतः पत्रकार परिषद आयोजित करून मतदारांना मतदानासाठी आवाहन करणे.<br>➢ मतदानाच्या एक दिवस आधीदेखील पत्रकार परिषद घेऊन मतदारांना मतदानासाठी पुन्हा आवाहन करणे आणि मतदान केंद्रांवरील सेवासुविधांबाबत मतदारांना अवगत करणे. |

| | | |
|---|---|---|
| दिपाली जोशी<br>समाज विकास अधिकारी<br>समाज विकास विभाग,<br>अवंतिका भोईर,<br>शिक्षण विभाग, | मतदारांना शपथ देणे | ➢ सर्व मनपा शाळा, खाजगी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी ठिकाणी मतदारांना मतदान करण्याची शपथ देणे. |
| योगेश गुणिजन, सहा. आयुक्त<br>प्रभाग क्र. १ ,<br>लोरेटा गाडगे, सहा. आयुक्त<br>प्रभाग क्र. २ ,<br>दत्तात्रेय वरकुटे सहा. आयुक्त<br>प्रभाग क्र. ३ ,<br>स्वप्निल सावंत, सहा.आयुक्त<br>प्रभाग क्र. ४ ,<br>जितेंद्र कांबळे, सहा.आयुक्त<br>प्रभाग क्र. ५ ,<br>प्रियंका भोसले, सहा.आयुक्त<br>प्रभाग क्र. ६ ,<br>सहा. आयुक्त<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग | मतदारांना शपथ देणे | ➢ शासकीय कार्यालये, खासगी आस्थापना, मॉल्स विविध सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी ठिकाणी मतदारांना मतदान करण्याची शपथ देणे. |
| दिपाली जोशी,<br>समाज विकास अधिकारी,<br>समाज विकास विभाग<br>अवंतिका भोईर,<br>शिक्षण विभाग,<br>योगेश गुणिजन, सहा. आयुक्त<br>प्रभाग क्र. १ तथा सहा. आयुक्त,<br>घनकचरा विभाग,<br>लोरेटा गाडगे, सहा. आयुक्त<br>प्रभाग क्र. २ ,<br>दत्तात्रेय वरकुटे सहा. आयुक्त<br>प्रभाग क्र. ३ ,<br>स्वप्निल सावंत, सहा.आयुक्त<br>प्रभाग क्र. ४ ,<br>जितेंद्र कांबळे, सहा.आयुक्त<br>प्रभाग क्र. ५ ,<br>प्रियंका भोसले, सहा.आयुक्त<br>प्रभाग क्र. ६ ,<br>सहा. आयुक्त<br>सर्व स्वच्छता निरीक्षक<br>प्रभाग समिती क्र. १ ते ६. | विद्यापीठ/ महाविद्यालये | ➢ सर्व मनपा शाळा, खाजगी शाळा, विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये मतदार जागृतीबाबत वादविवाद, वक्तृत्व, निबंध, चित्रकला, पथनाट्य, रिल्स इ. स्पर्धांचे आयोजन करणे.<br>➢ विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरव करून, त्यांनी सादर केलेल्या कलांचा मतदार जागृतीसाठी वापर करणे.<br>➢ महाविद्यालयांच्या मदतीने अधिकाधिक मतदारांना प्रोत्साहन देण्यासाठी सोसायट्यांना दत्तक देऊन घराघरापर्यंत पोहोचणे.<br>➢ उत्कृष्ट काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा सोसायट्यांना बक्षिसे देण्याबाबत विचार करणे. |
| स्वप्निल सावंत, सहा.आयुक्त<br>जाहिरात विभाग | फलक/होर्डिंग लावणे | ➢ शासकीय कार्यालये, नागरी सुविधा केंद्र, रुग्णालये, बँका, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणी, मुख्य चौक इ. ठिकाणी फलक लावणे.<br>➢ पेट्रोल पंप, एल.पी.जी. गॅस वितरक, शिधा वाटप दुकाने इत्यादी ठिकाणी फलक लावणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ व्यावसायिक होर्डिंगसाठी जनहितार्थ राखीव असलेल्या दिवसांचा वापर करणे. |
| **दिनेश कानगुडे सहा.आयुक्त**<br>**परिवहन विभाग** | परिवहन सेवा | ➢ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची वाहने व परिवहन सेवेच्या बसेसवर फलक/बॅनर लावणे.<br>➢ एसटी बस, बस स्थानक, लोकल ट्रेन, रेल्वे स्थानक इत्यादी ठिकाणी फलक/बॅनर लावणे.<br>➢ सार्वजनिक परिवहन सेवेच्या बसमध्ये किंवा लोकल ट्रेनमध्ये असलेल्या उद्घोषणेच्या सुविधेच्या माध्यमतून मतदारांना मतदानासाठी आवाहन करणे.<br>➢ बस तिकिटांवर मतदानाचे आवाहन करणे आणि मतदानाची तारीख प्रसिद्ध करणे. |
| **दिपाली जोशी**<br>**समाज विकास अधिकारी**<br>**समाज विकास विभाग/**<br>**आनंद गबाले.**<br>**नाट्यगृह व्यवस्थापक,/**<br>**योगेश गुणिजन, सहा. आयुक्त**<br>**प्रभाग क्र. १ ,**<br>**लोरेटा गाडगे, सहा. आयुक्त**<br>**प्रभाग क्र. २ ,**<br>**दत्तात्रेय वरकुटे सहा. आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ३ ,**<br>**स्वप्निल सावंत, सहा.आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ४ ,**<br>**जितेंद्र कांबळे, सहा.आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ५ ,**<br>**प्रियंका भोसले, सहा.आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ६ ,**<br>**सहा. आयुक्त** | सिनेमागृह व नाट्यगृह | ➢ सिनेमागृह आणि नाट्यगृहांमध्ये मध्यंतराच्या वेळी मतदारांना मतदानासाठी आवाहन करणे.<br>➢ सिनेमा चालक/मालकांची बैठक आयोजित करून लोकहितार्थ संदेश प्रसारित करण्यास सांगणे,<br>➢ आवश्यकतेनुसार सिनेमागृहात व्यावसायिकदृष्टीने जाहिरात प्रसारित करणे. |
| **नितीन राठोड,वरिष्ठ लिपिक,**<br>**जयवंत भवर, लिपिक**<br>**माहिती व जनसंपर्क विभाग.** | वलयांकित व्यक्तींची मदत | ➢ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रातील किंवा बाहेरील अराजकीय वलयांकित (सेलेब्रेटी) व्यक्तीच्या माध्यमातून सोशल मीडियाद्वारे मतदानासाठी आवाहन करणे, उदा, खेळाडू, कलावंत, प्रसिद्ध लेखक इ. |
| **योगेश गुणिजन, सहा. आयुक्त**<br>**प्रभाग क्र. १ ,**<br>**लोरेटा गाडगे, सहा. आयुक्त**<br>**प्रभाग क्र. २ ,**<br>**दत्तात्रेय वरकुटे सहा. आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ३ ,**<br>**स्वप्निल सावंत, सहा.आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ४ ,**<br>**जितेंद्र कांबळे, सहा.आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ५ ,**<br>**प्रियंका भोसले, सहा.आयुक्त**<br>**प्रभाग क्र. ६ ,**<br>**सहा. आयुक्त,** | स्वयंसेवी संस्था/ महिला बचत गट | ➢ विविध स्वयंसेवी संस्थांना उत्स्फूर्तपणे मतदार जागृती करण्याचे आवाहन करणे.<br>➢ स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून व्याख्याने, चर्चासत्र, विविध स्पर्धांचे आयोजन करणे. इ.<br>➢ मतदार जागृतीबाबत पथनाट्य स्पर्धा घेणे व उत्कृष्ट पथनाट्यांचे सादरीकरण करणे.<br>➢ महिला बचत गटांचे मेळावे आयोजित करून जागृती करणे. |

| | | |
|---|---|---|
| **सर्व स्वच्छता निरीक्षक प्रभाग समिती क्र. १ ते ६, दिपाली जोशी समाज विकास अधिकारी समाज विकास विभाग, चारुशिला खरपडे महिला व बालकल्याण विभाग.** | | |
| **शरद नानेगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभाग / चंद्रकांत बोरसे, सहा. आयुक्त, कर विभाग.** | विविध देयके/निविदा | ➢ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्ता व पाणीपट्टीच्या देयकावर मतदानकरण्याचे आवाहन करणारा संदेश प्रसिद्ध करणे.<br>➢ महावितरण कंपनी, बीएसएनएल, एमटीएनएल इत्यादींच्या देयकांवर मतदानाचे संदेश प्रसिद्ध करणे. |
| **दिनेश कानगुडे सहा.आयुक्त परिवहन विभाग** | प्रादेशिक परिवहन कार्यालय | ➢ प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांशी समन्वय साधून रिक्षा, टॅक्सी, ओला, उबर इत्यादींच्या चालक- मालकांची बैठक घेऊन त्यांना मतदार जागृती अभियानात सहभागी करून घेणे.<br>➢ रिक्षा, टॅक्शी, ओला, उबर व अन्य खासगी प्रवाशी वाहनांवर मतदार जागृतीचे स्टीकर लावणे. |
| **स्वप्निल सावंत सहा.आयुक्त जाहिरात विभाग व सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग** | खासगी आस्थपाना | ➢ विविध टूर्स ऑपरेटर्स, हॉटेल, रिसॉर्ट, रेस्टॉरंट असोसिएशन आदींच्या बैठका घेऊन त्यांच्या माध्यमातून मतदार जागृती करणे.<br>➢ मतदान करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून ग्राहकांना स्वच्छेने सवलत देण्याबाबत संबंधित संघटना आवाहन करणे.<br>➢ टूर्स ऑपरेटर्सचे कार्यालये, हॉटेल, रिसॉर्ट, रेस्टॉरंट इत्यादी ठिकाणी ठळकपणे मतदानाची तारीख दर्शविणारे फलक लावणे. |
| **दिनेश कानगुडे नगरसचिव** | राजकीय पक्ष | ➢ राजकीय पक्षांच्या बैठका घेऊन त्यांना मतदारांमध्ये जागृती करण्याचे आवाहन करणे.<br>➢ राजकीय पक्षांच्या युवक व विद्यार्थी आघाड्यांना मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करणे. |
| **नितीन राठोड, लिपिक, सुनील राठोड, लिपिक माहिती व तंत्रज्ञान, जयवंत भवर, लिपिक माहिती व जनसंपर्क विभाग.** | सोशल मीडिया / डिजिटल मीडिया | ➢ सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मचा मतदार जागृतीसाठी प्रभावी वापर करणे.<br>➢ संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संकेतस्थळावर ठळकपणे मतदानाचा संदेश प्रसिद्ध करणे.<br>➢ बँकांच्या मदतीने एटीएम स्क्रीनवर संदेश प्रसारित करणे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे उपलब्ध मोबाईल क्रमांकांवर संदेश प्रसारीत करणे. (प्रॉपर्टी टॅक्सच्या संदेशाप्रमाणे)<br>➢ चॅटबॉट किंवा एआयसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करणे. |
| **राजकुमार घरन, सिस्टीम मॅनेजर, नितीन राठोड, लिपिक, सुनील राठोड, लिपिक माहिती व तंत्रज्ञान, जयवंत भवर, लिपिक** | प्रसारमाध्यमांचा उपयोग | ➢ मतदार जागृतीसाठी स्थानिक केबल वाहिन्यांवर मुलाखती, चर्चासत्रे आयोजित करणे,<br>➢ प्रसारमाध्यमांच्या स्थानिक प्रतिनिधींसाठी कार्यशाळेचे आयोजन करणे. |

| | | |
|---|---|---|
| माहिती व जनसंपर्क विभाग. | | ➢ स्थानिक एफएम वाहिन्यांवर निवेदकाच्या माध्यमातून उद्घोषणा करण्यासाठी सहकार्य मिळविणे.<br>➢ कम्युनिटी रेडिओंचा प्रभावी व व्यापक प्रमाणात वापर करणे पत्रकार संघटनांना मतदार नोंदणी आणि जागृती अभियानात सहभागी करुन घेणे.<br>➢ प्रसारमाध्यमांना जनहितार्थ संदेश / जाहिराती प्रसारीत करण्याची विनंती करणे.<br>➢ आकाशवाणी व दूरदर्शनवरील फोन इन सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमांतून जागृतीबाबत श्रोत्यांच्या/दर्शकांच्या शंका / प्रश्नांना उत्तरे देणे. |
| नितीन राठोड, लिपिक,<br>जयवंत भवर,लिपिक<br>माहिती व जनसंपर्क विभाग | माध्यम आराखडा | ➢ स्थानिक गरज व उपलब्ध निधी विचारात घेऊन आपापल्यास्तरावर माध्यम आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणे.<br>➢ माध्यम आराखड्यानुसार स्थानिक वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, जाहिराती देणे.<br>➢ बाह्य मीडियाचा (उदा. होर्डिंग) वापर करणे.<br>➢ चित्ररथ किंवा अन्य अभिनव उपक्रम राबविणे. |
| सुनिल यादव, सहा.आयुक्त<br>मध्यवर्ती भांडार विभाग,<br>सतिश भरसठ ,लिपिक<br>मध्यवर्ती भांडार विभाग, | आवश्यक साहित्य तयार ठेवणे | ➢ वृत्तपत्रात प्रसिद्धीस द्यावयाच्या जाहिरातींचे नमुने. (आर्ट वर्क)<br>➢ घडी पुस्तिका / माहिती पत्रके,<br>➢ ठिकठिकाणी लावावयाच्या फलकांचे (पोस्टर्स) नमुने, |
| नितीन राठोड, लिपिक,<br>सुनील राठोड, लिपिक<br>माहिती व तंत्रज्ञान,<br>जयवंत भवर, लिपिक<br>माहिती व जनसंपर्क विभाग. | आवश्यक साहित्य तयार ठेवणे | ➢ व्हाट्सअॅप, फेसबुक इ. सोशल मीडियासाठी आकर्षक क्रिएटिव्ह संदेश,<br>➢ सोशल मीडियासाठी मायक्रो फिल्मस,<br>➢ विविध मोबाईल ऑपरेटर्सच्या माध्यमातून पाठवायचे एसएमएस<br>➢ आकाशवाणी आणि एफएम चॅनल्ससाठी जिंगल्स दूरदर्शन आणि इतर विविध वाहिन्यांसाठी ऑडीओ व्हिज्युअल स्पॉट. |

वरील आदेशाचे पालन करण्यात तसेच कामात टाळाटाळ केल्यास आपणाविरुध्द भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ अन्वये कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

डॉ. सचिन बांगर
निवडणूक निर्णय अधिकारी तथा
उपायुक्त (मु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव —
मा. प्रशासक तथा आयुक्त,
मा. अति. आयुक्त — १
मा. अति. आयुक्त — २
उपायुक्त (सर्व).
मिरा भाईंदर महानगरपलिका,